संकटात सापडलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांची धडपड यशस्वी; असोलामेंढा प्रकल्पातून पाणी सोडण्याचा निर्णय

आ. मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद; पुढील २ ते ३ दिवसांत असोलामेंढा प्रकल्पातून पाणी सोडणार

मुल व सावली तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा; धान पिकांना मिळणार नवसंजीवनी

आ.मुनगंटीवार यांची जिल्हाधिकारी व मुख्य अभियंत्यांशी थेट चर्चा; शेतकऱ्यांसाठी पाणी सोडण्याची आग्रही मागणी

चंद्रपूर : मुल व सावली तालुक्यातील पावसाच्या खंडामुळे संकटात सापडलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेली धडपड अखेर यशस्वी ठरली आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांना जीवदान मिळावे, या उद्देशाने त्यांनी चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना पत्र पाठवून असोलामेंढा प्रकल्पातून तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली. याचबरोबर गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता अजय दाभाडे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधूनही तातडीने कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत प्रशासनाने असोलामेंढा प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडण्याचा निर्णय घेतला असून, पुढील २ ते ३ दिवसांत पाणी सोडण्यात येणार असल्याचे संबंधित विभागाने अधिकृत पत्राद्वारे कळविले आहे.

मुल तालुक्यातील नांदगाव, बेंबाळ, जुनासुर्ला तसेच सावली तालुक्यातील सावली, पाथरी, निमगाव, व्याहाड, कापसी, खेडी आणि साखरी परिसरात पावसाने मोठा खंड पडल्याने धानाची रोपे करपू लागली होती. ही गंभीर परिस्थिती लक्षात येताच आ. सुधीर

मुनगंटीवार यांनी तातडीने प्रशासनाशी संपर्क साधून शेतकऱ्यांचे उभे पीक वाचविण्यासाठी असोलामेंढा प्रकल्पातून त्वरित पाणी सोडण्याची मागणी केली. पत्रव्यवहाराबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांनी या विषयाचा पाठपुरावा केला.

आ. मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल घेत असोलामेंढा प्रकल्प पुनर्निर्माण विभाग, सावली यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत व्हर्च्युअल बैठकीद्वारे परिस्थितीचा आढावा घेतला. बैठकीतील चर्चेनंतर पुढील २ ते ३ दिवसांत असोलामेंढा धरणातून सिंचनासाठी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंत्यांनी अधिकृत पत्राद्वारे दिली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने शेतकऱ्यांचे प्रश्न केवळ विधानसभेत मांडण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या अडचणीला प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले आहे. या प्रकरणातही पत्र, दूरध्वनी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्यपूर्ण समन्वय साधत त्यांनी प्रशासनाला तातडीने निर्णय घेण्यास भाग पाडले.

असोलामेंढा प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असल्याने मुल व सावली तालुक्यातील शेकडो धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा दिलासा मिळणार असून, पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या संकटातून त्यांना सावरण्यास मोठी मदत होणार आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या या प्रभावी पाठपुराव्यामुळे धान पिकांना वेळेवर पाणी मिळणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आ.मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

दुरध्वनी क्र. :- ०७१७४-२७४८१४

Email Id :- eeaprdn2@gmail.com

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण विभाग क्र. २, सावली**

**जि. चंद्रपूर ४४१२२५**

**जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या** – http://wrd.maharashtra.gov.in

---

जा.क्र./१०१९ /आ.प्र.नु.वि.२/तांशा-२/२०२६ दिनांक:- १४/ ०७ /२०२६

**प्रति,**

**मा. सुधीर मुनगंटीवार**

विधानसभा सदस्य,

बल्लारपूर, जि. चंद्रपूर

**विषय:- मुल तालुक्यातील नांदगाव, बेंबाळ, जुनासुर्ला या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील धानाचे पऱ्हे व आवत्या पाण्याअभावी करपुन जात असल्यामुळे असोलामेंढा प्रकल्पाचे पाणी सोडण्याबाबत**.

**संदर्भ:-** आपले पत्र क्रमांक : ५७६१/जुलै / २०२६ दिनांक. १३.०७.२०२६

***********

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने मुल तालुक्यातील नांदगाव, बेंबाळ, जुनासुर्ला या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील धानाचे पऱ्हे व आवत्या पाण्याअभावी करपुन जात असल्यामुळे असोलामेंढा प्रकल्पाचे पाणी सोडण्याबाबत आपले पत्र या विभागास प्राप्त झाले . आज दिनांक १४/०७/२०२५ रोजी मा अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ नागपूर यांच्यासोबत V.C मार्फत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील २-३ दिवसामध्ये आसोलामेंढा धरणाचे पाणी सिंचनाकरीता सोडण्यात येईल असे नियोजित आहे.

करिता माहिती व पुढील कार्यवाहिस्तव सविनय सादर.

**सहपत्र:-** निरंक

(प्र. बा. गायकवाड)

**कार्यकारी अभियंता**

आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण

विभाग क्र.२, सावली.